स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन विषय

´अनुसूचित जाती-जमातीच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा, सन २०१० ते २०२५)´

मानव्यविद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी. संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधक

साहेबराव चांदू बोयवारे

रा. लाडका ता. कंधार जि.नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. व्ही. के. मदनुरे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

पानसरे महाविद्यालय, अर्जापुर ता. बिलोली जि. नांदेड.

डिसेंबर २०२४

❖ प्रस्तावना :-

अनुसूचित जाती - जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा) सन २०१० ते २०२५ पाहत असतांना नांदेड जिल्ह्यातील अनु.जाती – जमातींच्या लोकांची आर्थिक स्थिती जाणून घेणे अगदी महत्वाचे असलेले दिसून येते. सद्यस्थितीत नवयुवक तरुण हा शैक्षणिक तसेच आर्थिक प्रगतीसाठी शहरी भागाकडे वळत आहेत. औद्योगिक बेरोजगारी, कारखान्यातील उत्पादन कमी असल्याच्या अनुषंगाने या समाजाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व परिस्थितीचा विचार केला असता आपल्या देशात केंद्र सरकार व त्याच्या घटक राज्याचे घटक सरकार हे सामाजिक न्याय विभागांतर्गत अनेक कल्याणकारी राज्याची भूमिका बजावतात. कल्याणकारी राज्याची भुमिका बजावित असतांना देशाचे सरकार व राज्या-राज्यांची सरकारे ही आपल्या देशातील राज्यातील लोकांची संरक्षणाची कल्याणाची हिताची व इतर कर्तव्य व जबाबदारीची भूमिका बजावित असतात.

देशात / राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत सरकार नव-नविन योजनांचा अवलंब करून भारत सरकार हे संपूर्ण देशाकरिता कर्तव्ये, जबाबदारीचे नियोजन, उपाययोजना, अनुसूचित जाती - जमातीतील विविध घटकांतील व्यक्तींचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाच्या अनुषंगाने कल्याणकारी योजना आखून राबवित असते. अनुसूचित जाती – जमातीच्या कल्याणासाठी सामाजिक न्याय विभागाने विविध योजना आखलेल्या आहेत. यात शैक्षणिक, आर्थिक उन्नती, गृहनिर्माण इतर योजनांचा समावेश झालेला दिसून येतो.

देशातील सर्व घटक राज्यांचा विचार केला असता, देशातील सर्व घटकराज्य व त्यात महाराष्ट्र स्तरावर महाराष्ट्र शासनाद्वारे वरील सर्व बाबींची पुर्तता करीत असते.

❖ संशोधन समस्या / विषय निवडीची कारणे हेतू :-

भारतात सतत वाढणारी लोकसंख्या ही देशापूढील असणारी एक समस्या आहे. कारण सन २००१ च्या जनगणनेनूसार भारताची लोकसंख्या १०२.७ कोटी इतकी होती. ती सन २०११ मध्ये १२५ कोटी एवढी वाढ झालेली दिसून येते. सद्यस्थितीत भारताची एकूण लोकसंख्या ही अंदाजे १३५ कोटी एवढी अवाढव्य झालेली दिसून येते.

त्यानुषंगाने, भारतातील जागतिकीकरणाचा विविध क्षेत्रात झालेला अनुकूल-प्रतिकुल परिणाम पाहता विविध बाजार पेठेतील खुल्या किंमतीचे चढ-उतार त्यात स्पर्धात्मक युग त्यातच महाराष्ट्राचा विचार केला असता, महाराष्ट्रात सुशिक्षित बेरोजगारांची रोजगार केंद्रातील नोंदणी संख्या खुप मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते.

प्रत्येक वर्षी विविध शाखेमधून शाळा, महाविद्यालय, उच्च महाविद्यालय, तांत्रीक संस्था विविध कोर्सेसच्या माध्यमातून शिक्षण घेऊन सुशिक्षीत तरुण – तरुणी बाहेर पडतात. त्यामुळे अशा बेरोजगार व दारिद्रयात जीवन जगत असलेल्या बेरोजगार सुशिक्षितांची स्वयंरोजगाराकडे वळावे. त्यातून त्यांचा जास्तीच्या प्रमाणात आर्थिक फायदा व्हावा. त्यानुषंगाने भारत सरकारच्या विविध विभागामार्फत राष्ट्रीयकृत बँका, विविध महामंडळे, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग या विभागामार्फत इतर विविध खात्याची विविध महामंडळ व सहकारी बँका, पतसंस्था यांच्यामार्फत कर्जपुरवठा केला जातो.

विविध महामंडळाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती – जमातीतील ग्रामीण व शहरी भागातील लोकांचा जास्तीत – जास्त प्रमाणात बेकारी - दारिद्रय दुर व्हावे व त्यांची आर्थिक प्रगती होऊन त्या - त्या जाती - जमातीच्या लोकांना चांगले जीवन जगता यावे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध महामंडळाची भूमिका उदा. १) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ २) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळ ३) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार

महामंडळ ४) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ ५) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग व विकास महामंडळ इ. या विविध महामंडळाची भूमिका / कार्य ही अत्यंत महत्वाची आहेत. अर्थात ग्रामीण व शहरी भागाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व इतर सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास भारत सरकार केंद्र सरकारच्या विविध योजना, राज्य सरकार राज्य सरकारच्या विविध योजना, केंद्र राज्य सरकारची प्रत्येक विभाग उदा. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विविध महामंडळे, सहकारी संस्था, सहकारी बँक, पतसंस्था इ. मार्फत मदत होत असते. तसेच अनुसूचित जाती - जमातीमध्ये मागासवर्गीयांना शैक्षणिक बाबतीत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध शैक्षणिक सोयी - सुविधांचा लाभ प्राप्त झालेला दिसून येतो. त्यात, अनुसूचित जाती – जमातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणक्षेत्रामध्ये मिळणाऱ्या लाभामुळे स्थुलमानाने शिकवणी फी व परिक्षा फी यांची माफी, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या, शालान्तपूर्व, शालान्त परिक्षोत्तर शिक्षणाकरिता शिष्यवृत्या, अनुसूचित जाती – जमातीतील मुलां-मुलींकरीता शासकीय निवासी वसतिगृह, शासकीय निवासी शाळा, स्वयंफुर्त संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतिगृहांना अनुदान, मागासवर्गीय वसतिगृहांना ईमारत अनुदान स्वच्छता राखणाऱ्या कामगारांच्या मुलांकरिता निवासी शाळा उघडणे इ. शैक्षणिक योजनांचा महत्वाचा भाग आहे.

भारताच्या विविध घटक राज्यानुसार महाराष्ट्र हे एक घटक राज्य आहे. महाराष्ट्र या घटक राज्यातील नांदेड हा एक जिल्हा आहे. मराठवाड्यातील महत्वाचा जिल्हा नांदेड असून सदर जिल्ह्यात एकूण १६ तालुके आहेत. छत्रपती संभाजीनगर नंतर मराठवाड्यात नांदेड जिल्हा मोठा आहे. सदर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३३,६१,२९२ असून अनु.जातीची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ०६,४०,४८३ एवढी आहे. नंदीतट या शब्दापासून नांदेड या नावाची उत्पत्ती झाली आहे. नांदेड येथे जगप्रसिध्द

गुरूद्वारा असनू शिखांचे दहावे व शेवटचे गुरू श्री. गोविंदसिंग यांच्या पवित्र समाधीमुळे देवीच्या साडेतीन शक्ती पिठापैकी एक जागृत स्थळ रेणूकामातेचे मंदिर १३ व्या शतकात यादवकालीन राजाने बांधले आहे. नांदेड पासून ५७ कि.मी. अंतरावर लोहा तालुक्यात भगवान खंडोबाचे मंदिर आहे. माळेगाव यात्रा मार्गशिर्ष महिन्यात आयोजन केले जाते. तसेच मराठवाड्यातील ही मोठी पशुबाजार पेठ असून यासाठी प्रसिध्द आहे. माळेगाव हे गाव नांदेड-लातूर या रस्त्यावर वसलेले आहे. नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यात चालुक्यकालीन हेमाडपंथी मंदीर असून दरवर्षी होट्टल महोत्सव जिल्हा प्रशासनातर्फे घेण्यात येतो. किनवट तालुक्यात उनकेश्वर मंदीर असून येथे सल्फर व फॉस्पेटयुक्त पाणी यामुळे गरम पाण्याचे झरे आढळतात. नांदेड जिल्ह्यात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ असून सदर विद्यापीठांतर्गत ३८९ महाविद्यालये संलग्न आहेत. नांदेड जिल्ह्यास संस्कृत कवीचे शहर म्हटले जाते. तसेच मराठी कवी विष्णुपंथ, श्री. रघुनाथ व श्री. वामनपंडीत यांचा जन्म व कार्यस्थळ नांदेड आहे. नांदेड शहरात आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प विष्णूपुरी धरण आहे जे गोदावरी नदीवर बांधले आहे. नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर या तालुक्यात महाविहार बावरी नगर, दाभड येथे अखिल भारतीय बौध्द धम्म परिषदेचे दरवर्षी पौष पौर्णिमेला आयोजन करण्यात येते. तसेच महाविहार बावरीनगर, दाभड या ठिकाणास ऐतिहासिक तिर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

नांदेड जिल्हा पातळीवरील आर्थिक सामाजिक समस्या सोडविण्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळाचे योगदान / भूमिका / सहकार्य अधिक महत्वाचे आहे. ही बाब जाणून घेण्यासाठी म्हणून हा प्रबंध आहे.

❖ संशोधन विषयाचे उदिष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी संशोधकाने खालील उदिष्ट्ये निश्चित केली आहेत.

१. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातीमधील लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
२. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातींना मिळणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
३. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातींच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था (बार्टी, आर्टी, टी.आर.टी.आय) मधील शैक्षणिक लाभ लेखाजोखा तपासणे.
४. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळांनी भांडवल निधी कसा उभारला / भांडवल सहाय्य कोण व किती प्रमाणात दिले ते अभ्यासणे.
५. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातींच्या सन २०१९ नंतरची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासातील भर अभ्यासणे.

❖ संशोधन विषयाचे गृहितके :-

अनुसूचित जाती - जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा) सन २०१० ते २०२५ या संशोधन विषयाचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी संशोधकाने खालील गृहीतकांची मांडणी केली आहे.

१. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातीतील कुटूंबांना शासकीय योजनांचा लाभ अतिशय कमी प्रमाणात मिळतो.

२. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातींच्या व्यक्तींना शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी महामंडळामार्फत योजना त्यांचा लाभ.

३. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातींच्या घटकांना स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी टॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा झाल्याने आर्थिक स्थितीवर अनुकूल परिणाम झाला.

४. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातीचे आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थान फार चांगले नाही.

५. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातीतील तरुणांचे बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे.

❖ संशोधन पध्दती / तथ्य संकलन :-

प्रस्तुत "अनुसूचित जाती - जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा) सन २०१० ते २०२५" सुक्ष्म (नमुना) अध्ययन या प्रकारचे असेल संकलित तथ्यांची मांडणी वर्णनात्मक आणि विश्लेषणानात्मक या दोन्ही प्रकारची असेल या संशोधन पध्दतीमधील (अ) प्राथमिक मार्ग (ब) दुय्यम मार्ग खालीलप्रमाणे सांगता येईल.

(अ) प्राथमिक मार्ग :-

प्राथमिक मार्ग यात मुलाखत / भेट / प्रश्नावली – अनुसूचित जाती-जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा) सन २०१० ते २०२५ याचे सर्वेक्षण करण्यासाठी प्राथमिक मार्ग म्हणून मी या विविध महामंडळाचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब / व्यवस्थापक,

विविध जिल्ह्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग येथे कार्यरत असलेले मा. सहाय्यक आयुक्त व विविध विभागाचे इतर कर्मचारी यांची मुलाखत घेणार व आर्थिक अध्यापन सर्वेक्षण व सामाजिक परिणाम यासाठी आवश्यक ते प्रश्न विचारून आवश्यक ती माहिती संकलित करणार तसेच या विविध महामंडळाचे मुंबईतील मुख्य कार्यालयास भेटी देऊन आवश्यक त्या – त्या अधिकाऱ्यांना भेटून आवश्यक ती कागदपत्रे पाहून, तपासून संशोधनासाठी आवश्यक ती माहिती त्या – त्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून मिळविणार.

त्याचप्रमाणे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य खाते अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळाचे आर्थिक अध्ययन / सर्वेक्षण करण्यासाठी या विविध महामंडळाचे एक घटक म्हणून या विविध महामंडळाच्या प्रत्येकी किमान ५० / १०० कर्जदारांना / लाभार्थींना मी प्रत्यक्ष भेटणार व या महामंडळासंबंधी आवश्यक ते प्रश्न विचारून आवश्यक ती माहिती संकलित करणार.

(ब) दुय्यम मार्ग :

वार्षिक अहवाल वाचन व इतर माहिती वाचन - "अनुसूचित जाती - जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा) सन २०१० ते २०२५" यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळांचे योगदान सर्वेक्षण करण्यासाठी मी दुय्यम मार्ग म्हणून मी या विविध महामंडळाचे मा. व्यवस्थापक / कार्यकारी अधिकारी साहेब यांच्याकडून या विविध महामंडळाचे प्रकाशित केलेले विविध आर्थिक वर्षाचे अहवाल, विविध कागदपत्रे, पुस्तके, संदर्भ पुस्तके या महामंडळाच्या विविध विभागाचे कर्मचारी वर्ग यांच्याकडून मिळविणार व त्याआधारे सर्वेक्षणाची आवश्यक ती माहिती संकलित करून या विविध महामंडळाची प्रगती / विकास व तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असणारे मा.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

कार्यालय तसेच मा. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालयामार्फत व इतर बाबींचा अभ्यास करणार.

अशाप्रकारे प्रस्तुत या प्रबंधात विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक मार्गाद्वारे मुलाखत, प्रश्नावली / भेट इ. आणि साध्या यादृच्छिक नमुना पध्दतीद्वारे (या विविध महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, ग्राहक / कर्जदार यांच्याकडून) आणि दुय्यम माहितीसाठी या विविध महामंडळाची विविध कागदपत्रे, विविध पुस्तके, वार्षिक अहवाल, संदर्भ पुस्तके इ. आधारे माहिती संकलित करता येईल. त्याचबरोबर सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय साधनांबरोबरच सारणी / तक्ते, आलेख विभाजीत वर्तुळ इ. चा वापर केला जाईल.

❖ संशोधन विषयाची व्याप्ती :-

“अनुसूचित जाती - जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा, सन २०१० ते २०२५)” या प्रबंधाचे संशोधन करण्यासाठी हा १५ वर्षाचा कालखंड निवडण्यात आलेला आहे.

❖ संशोधन विषयाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा संशोधक प्राथमिक आणि द्वितीय माहितीवर अभ्यास करणार आहे. प्राथमिक माहिती प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण या आधारावर घेतले जाईल व संकलित केली जाईल. परंतू नागरीक / व्यक्ती ती माहिती अचूकपणे देतीलच असे नाही.

द्वितीय सामग्रीवरील आधारीत माहीतीमध्ये विश्वसनीय आकडेवारीचा अभ्यास, शासकीय गोपनीयता व अपूर्ण माहितीमुळे सामग्री संग्रहणावर मर्यादा पडतात. माहितीचा अपुरेपणा ही या विषयासंबंधीची मर्यादा आहे.

❖ स्वरुप (सामुग्री संग्रहनाची तंत्रे) :-

“अनुसूचित जाती - जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा, सन २०१० ते २०२५)”

या प्रबंधाचे संशोधन करण्यासाठी (मार्च २०१० - ११ ते मार्च २०२४- २५) या आर्थिक / वित्तीय वर्षाचे “नमुना निवड” सहेतुक नमुना पध्दती या पध्दतीनूसार अध्ययन / सर्वेक्षण करणार कारण आर्थिक अध्ययन सर्वेक्षण करण्यासाठी साधारण मागील ०३ किंवा त्यापेक्षा जास्त वर्षाचा विचार, अध्ययन केले जात नाही. त्यामुळे सलग ०३ वर्षाचा किंवा त्यापेक्षा अधिक वर्षाचा चढ-उतारांचा विचार लक्षात घेऊन त्यानुसार आवश्यक ते आर्थिक अध्ययन / सर्वेक्षण करता येते.

❖ संशोधन साहित्याचे सिंहावलोकन :-

“अनुसूचित जाती - जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा, सन २०१० ते २०२५)” या प्रबंधाचे संशोधन करीत असतांना मागील सर्व योजनांचा पाठपुरावा करावा लागतो. सदरील योजनेमध्ये अनुसूचित जाती - जमातींच्या व्यक्तींना कसा आर्थिक लाभ होईल यानुषंगाने मागील आढावा घेणे गरजेचे आहे. जसे की, मागील ज्या काही सामाजिक विकासाच्या योजना आहेत. त्यात आर्थिक बाबतीत वाढ झाली आहे का ? विविध महामंडळामध्ये कर्जाच्या रक्कमेत वाढ झाली आहे का ? त्याचे निकष बदललेले आहेत का ? याचा मागील आढावा घेणे म्हणजेच सिंहावलोकन करणे गरजेचे आहे.

❖ सर्वेक्षण करण्याची पध्दती :-

(१) समग्र पध्दती / पुर्ण गणना पध्दत / राशी पध्दत (२) नमुना पध्दत – पूर्ण गणना पध्दती किंवा नमुना पध्दती वापरून सामग्री संकलित करता येते. त्यानुसार मी नांदेड जिल्ह्यातील विविध अनुसूचित जाती – जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासात महाराष्ट्र शासनाचे योगदान (सन २०१० ते २०२५) या प्रबंधाचे संशोधन करण्यासाठी नमुना पध्दतीचे प्रकार (१) निर्हेतुक (यादृच्छिक) नमुना पध्दती – पुर्वग्रह न ठेवता सोडत पध्दतीने व विशिष्ट क्रमवारीने नमुना निवडण्याची पध्दत म्हणजे निर्हेतुक नमुना पध्दती होय. या

पध्दतीत संशोधकाच्या आवडी निवडीस वाव नसतो. तसेच राशीतील घटकांची नमुन्याची निवड होण्याची समान शक्यता असते.

(२) सहेतुक नमुना पध्दती / गटनिहाय नमुना पध्दत / कोटा पध्दत – विशिष्ट हेतु मनात बाळगून त्यानुसार नमुना निवडण्याची पध्दत म्हणजे सहेतुक नमुना पध्दती होय. यापध्दती नमुना निवडण्याचे स्वातंत्र्य संशोधकाला असते. मात्र त्याने नमुने निवडतांना समुहाचे किंवा राशींचे योग्य प्रतिनिधीत्व करु शकणाऱ्यांचीच निवड करावी अशी अपेक्षा असते. या पध्दतीत कोणतेच वेगळे तत्व किंवा सिध्दांत नाही. संशोधक स्वत:च्या विवेकानुसार नमुन्याची निवड करत असल्याने गणना क्षेत्रातील प्रत्येक प्रकारच्या घटकांचा समावेश नमुन्यात होऊ शकतो. यानुसार मी नांदेड जिल्ह्यातील विविध अनुसूचित जाती – जमातींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासात, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळांनी (सन २०१० ते २०२५) या कालखंडात दिलेल्या कर्जदारांच्या / लाभार्थीची संख्या प्रमाण लक्षात घेऊन त्याप्रमाणे मी संशोधन प्रबंध पुर्ण करेल.

❖ नियोजीत प्रकरण योजना :

प्रकरण (१) प्रस्तावना व संशोधन पध्दती

पहिल्या प्रकरणात भारतातील जातीय व्यवस्थेचे वर्गीकरण / प्रकार, संशोधनाचा विषय / हेतू उद्दिष्टे, संशोधनाची पध्दती / तथ्य संकलन (अ) प्राथमिक मार्ग (ब) दुय्यम मार्ग, संशोधन विषयाची व्याप्ती / कालखंड, स्वरुप (सामुग्री संग्रहनाची तंत्रे), सर्वेक्षण करण्याच्या पध्दती (१) समग्र पध्दती (२) नमुना पध्दती, नमुना पध्दतीचे प्रकार (१) निर्हेतुक नमुना पध्दती (२) सहेतुक नमुना पध्दती.

प्रकरण (२) संदर्भ साहित्याचा आढावा - विषय विश्लेषण

दुसऱ्या प्रकरणात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची विविध योजनांचा तपशील तसेच संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन करण्यात येईल. संशोधन विषयाशी निगडीत पुस्तके, संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमान पत्रे, साप्ताहीके, मासिके, त्रैमासिके यात प्रकाशित विविध तज्ञांच्या लेखांचा सारांश रुपात आढावा घेण्यात येईल.

प्रकरण (3) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध समाज उपयोगी योजना तसेच महामंडळे यांचा अभ्यास.

तिसऱ्या प्रकरणात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची विविध महामंडळे यांचे कार्यक्षेत्र, नांदेड जिल्ह्यातील काही ठिकाणांची ठळक संक्षिप्त माहिती नांदेड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील व्यापार / उद्योगधंदे नांदेड जिल्ह्यातील, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची विविध महामंडळे यांचा दृष्टीक्षेप.

प्रकरण (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपयोगी योजना.

चौथ्या प्रकरणात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य खाते अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध समाज / शैक्षणिक उपयोगी योजना यांचा अभ्यास करून सविस्तर माहिती मांडण्यात येईल.

प्रकरण (५) संकलित माहितीचे विश्लेषण

पाचव्या प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधीत संकलित करण्यात आलेल्या माहितीचे सविस्तर विश्लेषण करण्यात येईल. सदरील विश्लेषणासाठी विविध सांख्यीकीय साधनांचा

वापर करण्यात येईल. तसेच मांडण्यात आलेल्या गृहीतकृत्यांचे पडताळणी करून त्यांचे निष्कर्ष मांडण्यात येतील.

प्रकरण (६) निष्कर्ष व शिफारशी

सहाव्या प्रकरणात गोळा करण्यात आलेल्या माहितीच्या विश्लेषणाद्वारे प्राप्त झालेले निष्कर्ष मांडण्यात येतील. तसेच महाराष्ट्रातील व नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती – जमातींच्या विकासासाठी पुरक ठरतील अशा शिफारशी सुचवल्या जातील.

❖ संदर्भसूची :

१. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार – सतीश लळीत, लोकराज्य मुख्य संपादक – प्रमोद त्र्यंबक नलावडे, संपादक सुरेश वांदिले, सप्टेंबर २०१२, अंक ६ पृष्ठ क्र. ५.

२. सामाजिक संशोधन पध्दती – डॉ. बोधनकर – प्रा. विवेक अलोणी.

३. संशोधन पध्दती – प्रा. डॉ. प्रदिप आगलावे

४. प्रा. रायखेलकर दामजी – भारतीय अर्थव्यवस्था.

५. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनाचे पुस्तक २०२२-२३ – श्री. सुमंत भांगे (भा. प्र. से.,) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन.

६. Bhalchandar Mugekar : The Economy of Maharashtra

७. Desai A.R. – Rural Sociology in India.

८. www.wikipedia.org.

९. www.samajkalyannanded.in

१०. www.barti.in

११. www.trti.maharashtra.gov.in

१२. www.sjsa.maharashtra.gov.in

संशोधक
साहेबराव चांदू बोयवारे
रा. लाडका ता. कंधार जि.नांदेड

मार्गदर्शक
प्रा. डॉ. व्हि. के. मदनुरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
व संशोधन मार्गदर्शक,
पानसरे महाविद्यालय अर्जापूर
ता. बिलोली जि.नांदेड.